गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष २ रे | अंक ६१ वा | गुरुवार १८ जुलै २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 61 | Date : 18/07/2024 | blow Thursday | Page 4 Price 4

## हरियाणा सरकारची अग्निवीरांसाठी मोठी घोषणा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी अग्निवीरांसाठी मोठी घोषणा केली आहे. सैनी म्हणाले, अग्निवीरांना शासकीय नोकरीत १० टक्के आरक्षण मिळेल. आमचं सरकार हरियाणामधील अग्निवीरांना राज्य सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या विशिष्ट नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याची घोषित करत आहे. याअंतर्गत पोलीस हवालदार, मायनिंग गार्ड, फॉरेस्ट गार्ड, जेल वॉर्डन व एसपीओ पदांसाठी अग्निवीरांची थेट भरती केली जाईल. अग्निवीरांना गट क आणि गट ड मधील सरकारी पदांसाठी विहित केलेल्या कमाल वयोमर्यादेत तीन वर्षांची सूट दिली जाईल. परंतु, अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीला पाच वर्षांची सवलत दिली जाईल.गट क मधील नागरी विभागातील नोकऱ्यांमधील भरतीत अग्निवीरांसाठी पाच टक्के आरक्षण, गट ड मध्ये एक टक्का आरक्षण दिलं जाणार आहे. जे कारखाने अथवा उद्योग अग्निवीराला दरमहा ३० हजार रुपये किंवा त्याहून अधिक पगार देतील त्या कारखान्यांना, उद्योगांना । **पान २ वर**

# लाडक्या भावांसाठीही योजना, मुख्यमंत्र्यांची घोषणा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आषाढी एकादशीनिमित्त उद्या (१७ जुलै) पहाटे पंढरपूरच्या विठुरायाची शासकीय पूजा करणार आहेत. या पूजेसाठी ते आज संध्याकाळीच पंढरपुरात दाखल झाले. दरम्यान, संध्याकाळी त्यांनी पंढरपुरात आयोजित 'कृषी पंढरी' या कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. दरम्यान, शिंदे यांनी पंढरपुरातून लाडकी बहीण या योजनेनंतर विद्यार्थ्यांसाठीही खास योजनेची घोषणा केली. मुख्यमंत्र्यांनी या योजनेंतर्गत १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना आठ हजार रुपये आणि पदवीधर तरुणांना १० हजार रुपये स्टायपंड देण्याची घोषणा केली.

आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपूरमध्ये दाखल झाले आहेत. दरम्यान, यावेळी त्यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक कृषी पंढरी महोत्सवाचं उद्घाटन केलं. मुख्यमंत्र्यांबरोबर यावेळी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना शिंदे यांनी तरुणांसाठीच्या योजनेची घोषणा केली.

एकनाथ शिंदे । **पान २ वर**

## आता खासगी नोकऱ्यांमध्ये १०० टक्के आरक्षण..
### 'या' राज्याची विधेयकाला मंजुरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कर्नाटक : कर्नाटकातल्या सिद्धरामय्या सरकारने खासगी कंपन्यांमधील नोकऱ्यांबाबत मोठा निर्णय घेतला आहे.



कॅबिनेट कन्नडिगांसाठी खासगी नोकऱ्यांमध्ये १०० टक्के आरक्षण देण्यास मंजुरी दिली आहे. सोमवारी झालेल्या कॅबिनेटच्या बैठीकत हा निर्णय झाला अशी माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सोशल मीडियावरुन दिली आहे. हा निर्णय ऐतिहासिक आणि मोठा मानला जातो आहे. कारण आत्तापर्यंत कुठल्याही राज्याने अशा प्रकारचं पाऊल उचललेलं नाही.

आमच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आम्ही निर्णय घेतला आहे की खासगी कंपन्यांमधील क आणि ड वर्गाच्या पदांसाठी १०० टक्के आरक्षण असेल. कन्नडिग्गांना या आरक्षणाचा फायदा होणार आहेत. या पदांवर कन्नडिगांनाच १०० टक्के प्राधान्य दिलं गेलं पाहिजे. आमच्या मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. आम्ही आमचं राज्य कन्नडिगांसाठी चालवतो. त्यामुळे त्यांचं हित पाहणं ही आमची प्राथमिकता आहे.

कर्नाटक राज्य उद्योग, कारखाने आणि आस्थापना यामध्ये स्थानिक उमेदवारांना रोजगार देण्याबाबतचं विधेयक गुरुवारी सादर करणार आहे. या विधेयकात ही बाब नमूद करण्यात आली आहे की कुठला खासगी उद्योग, कारखाने किंवा इतर आस्थापना असतेली त्यात स्थानिकांना प्राधान्य दिलं पाहिजे. नोकरीसाठी इच्छुक असलेल्या ज्या कन्नडिगांकडे कन्नड शाळेचं प्रमाणपत्र नसेल त्यांना नोडल एजन्सीतर्फे कन्नड भाषेसंदर्भातली एक परीक्षा देणं अनिवार्य असणार आहे. तसंच ज्या विधेयकाला । **पान २ वर**

# उद्योगामुळे गडचिरोलीतील सामान्य माणूस समृद्धीकडे : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

गडचिरोली : येथील निर्माणाधीन सुरजागड पोलाद प्रकल्पातून ८ दशलक्ष टन तर लॉईड्स प्रकल्पातून ४ दशलक्ष टन पोलाद उत्पादन होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर महाराष्ट्रात ३० टक्के पोलाद उत्पादन एकट्या गडचिरोलीतून होणार आहे. त्यामुळे येथे उद्योग व रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होत असून माओवादामुळे मागे राहिलेला येथील सामान्य माणूस समृद्धीकडे जात असल्याचे चित्र आपणास पहायला मिळेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.सुरजागड इस्पात स्टील प्रकल्पाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज वडाळापेठ, अहेरी येथे करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. धर्मरावबाबा आत्राम, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, नक्षल विरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी संजय दैने, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री. निलोत्पल, लॉईड्स मेटलचे प्रमुख प्रभाकरन, सुरजागड इस्पात कंपनीचे प्रमुख सुनील जोशी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, गडचिरोली जिल्ह्यात सुरू होणाऱ्या उद्योगात ८० टक्के रोजगार स्थानिकांना उपलब्ध करून देण्याच्या अटी । **पान २ वर**



## एडीस डासांद्वारे होणाऱ्या 'झिका' विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : झिका हा डासांमार्फत पसरणारा एक विषाणूजन्य आजार आहे. झिका विषाणू हा मुख्यत्: एडीस डासांद्वारे प्रसारीत होणाऱ्या विषाणूमुळे होतो. हा डास दिवसा चावत असतो. या विषाणूच्या प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज असून एकात्मिक किटक व्यवस्थापन अंतर्गत एडीस डास प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये जलद ताप सर्वेक्षण मोहिमेतंर्गत रूग्णाच्या ३ ते ५ किलोमीटर भागामध्ये सर्वेक्षण करून रक्तजल नमुन्यांचे संकलन करण्यात येत आहे. गर्भवती महिलांचे रक्तजल नमुन्यांचे संकलन व तपासणी, सर्व रूग्णांना लक्षणांवर आधारीत उपचार, गर्भवती महिला व जननक्षम जोडप्यांना या आराजारातील धोक्यांबाबत मार्गदर्शन, एडीस डासांच्या प्रतिबंधासाठी प्रभावी किटक शास्त्रीय उपाययोजना करण्यात येत आहे.

राज्यामध्ये झिका या आजाराचे जानेवारी २०२४ पासून १६ जुलै २०२४ पर्यंत एकूण २५ रूग्ण आढळलेले आहेत. यामध्ये २१ रूग्ण पुणे शहरात आढळून आले आहे. तर एक रूग्ण सासवड (जि. पुणे) येथे, एक भूगांव (ता. मुळशी जि. पुणे) येथे आणि मे २०२४ मध्ये एक कोल्हापूर व एक संगमनेर येथे आढळून आला आहे. । **पान २ वर**

## आर्थिक मदतीमुळे राज्यातील एकलव्य मॉडेल निवासी विद्यालयांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत : राज्यपाल रमेश बैस

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राज्यातील ३८ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमध्ये कॉम्पुटरायझेशन प्रकल्प राबविण्याकरिता आपला सामाजिक दायित्व निधि उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्यपाल रमेश बैस यांनी आज जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे कौतुक केले. प्राधिकरणाच्या आर्थिक मदतीमुळे राज्यातील एकलव्य मॉडेल निवासी विद्यालयांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होईल. तसेच तेथील आदिवासी विद्यार्थी आजच्या स्पर्धात्मक युगात आत्मविश्र्वासाने सामोरे जाऊ शकतील, असे राज्यपालांनी सांगितले.राज्यपाल श्री. बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. १७) प्राधिकरणाच्या कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधीतून राबवावयाच्या या प्रकल्पासंदर्भात एका सामंजस्य करारावर राजभवन मुंबई येथे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सीड्रोम एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष विजय वासेकर यांचेसोबत सामंजस्य कराराचे हस्तांतरण केले. तसेच प्रातिनिधिक स्वरूपात धनादेश दिला.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने आपल्या सामाजिक दायित्व निधीतून या प्रकल्पासाठी ३.५० कोटी रुपये उपलब्ध करून दिले असून त्यातून एकलव्य मॉडेल



विद्यालयांना १००० संगणक व शिक्षकांसाठी ७६ टॅब्स देण्यात येणार आहे. आदिवासी विकास मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली उऊठजचए एजुकेशन सोसायटी या प्रकल्पाचे कार्यान्वयन करणार आहे. यावेळी प्राधिकरणाच्या महाव्यवस्थापक (प्रशासन) आणि सचिव मनीषा जाधव, आदिवासी विकास मंत्रालयातील उपसचिव डॉ. राजी एन.एस., मुख्य कार्यपालन अधिकारी नितीन एम. बोरवणकर, जी. वैद्यनाथन, कॅप्टन बाळासाहेब पवार, गिरीश थॉमस, तसेच प्राधिकरणाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा सांस्कृतिक भवनचे भूमिपूजन

✻ तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

✻राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा सांस्कृतिक भवनासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करण्यात येईल

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशी निमित्त राज्यातील लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात दाखल झाले असून पंढरपूर नगरी भक्ती रसात नाहून निघाली आहे. वारकऱ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि पंढरपूर तीर्थ क्षेत्र सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पंढरपुरातील भक्ती मार्गावर



बांधण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवनच्या भूमिपूजन प्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार भरत गोगावले, समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी सुनील वाळुंजकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, एक रुपयात शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना, साडे सात हॉर्स पॉवर पंपासाठी मोफत वीज, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत ३ सिलेंडर मोफत, मुलींना मोफत शिक्षण, । **पान २ वर**




## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व समर्थ गावकरिचे वतीने पंढरपुरात वारकरी पोलीस व पत्रकारांना छत्री वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःमहाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व समर्थक गावकरींचे वतीने पंढरपूर येथील वारकरी वर्गाला व पोलीस पत्रकार यांना छत्री वाटप करण्यात आले पत्रकार संघ व दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या वतीने श्री क्षेत्र पंढरपूर येथे वारकरी पोलीस व पत्रकारांना छत्री वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला संपादक डॉ. विश्र्वासराव आरोटे कार्यकारी संपादक नवनाथ जाधव नवी मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबवण्यात आला यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदीप सरचिटणीस डॉक्टर विश्र्वास आरोटे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे श्री राजेंद्र कोरके पाटील पश्र्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष व पंढरपूर शहराध्यक्ष विनोद पोतदार तालुकाध्यक्ष रामदास नागटिळक व पंढरपूर कार्याध्यक्ष नागेश अदापुरे पंढरपूर शहर सरचिटणीस कुमार कोरे । **पान २ वर**

# सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विविध मागण्यांचे निवेदन

## खासदार प्रणिती शिंदे यांनी मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना पंढरपूर येथे दिले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारी निमित्त पंढरपुरात आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना खासदार प्रणितीताई शिंदे यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विविध मागण्यांचे निवेदन पंढरपूर शासकीय विश्रामगृह येथे दिले. यावेळी शिष्टमंडळात माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, जिल्हा कार्याध्यक्ष अँड नंदकुमार पवार, मोहोळ तालुका अध्यक्ष सुलेमान, राजेश पवार, पंढरपूर शहर अध्यक्ष अमर सूर्यवंशी, मंगळवेढा तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, शहर कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, युवा नेते पृथ्वीराज माने, प्रशांत शिंदे, श्रीकांत मेलगे, रवी कोळेकर, संदीप पाटील, किरण घाडगे, संदीप पवार आदी उपस्थित होते.



यावेळी विविध मागण्यांचे निवेदनाचे पत्र मा. मुख्यमंत्री यांना देण्यात आले. ❊ २५१५ योजनेअंतर्गत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामे मंजूर करण्यात यावे ❊ अक्कलकोट तालुक्यातील बंदिस्त नलिका ऐवजी उघड्या कालव्याने कामे करण्यात यावे. ❊ अक्कलकोट तालुक्यातील विविध ठिकाणचे रस्ते मंजूर करण्यात यावेत. ❊ मंगळवेढा तालुक्यातील भोसे व ३९ गावांचा पाणीपुरवठा योजने संदर्भात ❊ मंगळवेढा तालुक्यातील २४ गावच्या प्रगतीपथावर असणाऱ्या उपसा सिंचन योजनेच्या टेंडरला मजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावे ❊ मंगळवेढा तालुक्यातील १९ गावांचा समावेश असणाऱ्या म्हैसाळ सिंचन योजनेच्या सहाव्या टप्प्यातील कामास निधी उपलब्ध करून कामे पूर्ण करण्यात यावे. ❊ मंगळवेढा तालुक्यातील मंजूर असलेले महात्मा बसवेश्वर स्मारकाची तत्काळ उभारणी करावी. ❊ पंढरपूर येथे चखऊ स्थापन करण्यात यावे ❊ पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत विकासकामांचा दर्जा सुधारणा करण्यासाठी आवश्यक पावले उचलावी ❊ मोहोळ तालुक्यातील दक्षिण भागात कामती, बेगमपुर (घोडेश्वर) कुरुल यापैकी एका ठिकाणी अप्पर तहसील कार्यालय मंजूर करावे ❊ भीमा नदीवर अरबळी तामदर्डी बंधारा मंजूर होणेबाबत व वडापुर बँरेज मंजूर करण्यात यावे ❊ वडापुर ता. दक्षिण सोलापूर येथील भीमा नदीवर बँरेज बांधकामास मंजुरी देऊन काम सुरू करण्यात यावा. ❊ भीमा नदीला कालव्याच्या दर्जा मिळावा. ❊ दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज (मं) कुरघोट, टाकळी, व करकल गावातील वीजपुरवठा आठ तास सुरू ठेवावा. ❊ दक्षिण सोलापूर मतदारसंघात औद्योगिक वसाहत उभी करावी. ❊ सिना नदीस कॅनलचा दर्जा देवून उजनीतून पाणी सोडण्यात यावे. ❊ सिना नदीवरील पाकणी ते कोर्सेगाव दरम्यान असलेले बंधारे दुरुस्त करण्यात यावे. ❊ मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा १० टक्के लोकवर्गणीची अट रद्द होऊन योजना शासनामार्फत पूर्ण करण्यात यावे. ❊ तीर्थक्षेत्र आळंद, देहू, भंडारा गड, व श्रीसंत चोखामेळा स्मारकासाठी महाराष्ट्र राज्य विकास आराखडा अंतर्गत मंजूर असणाऱ्या कामांची गती वाढवून श्रीसंत चोखामेळा स्मारकाचा विकास करण्यात यावा.

आदी मागण्या यावेळी करण्यात आला यावर मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर लवकरच उपाययोजना करून कामे मंजूर करू असे आश्वासन दिले.

## संपादकीय

### वारकऱ्यांची अपेक्षा..

वारकऱ्यांना आता विठुरायाच्या दर्शनाची मनी ओढ लागली आहे. शेकडो किलोमीटर पायी आलेले वारकरी चंद्रभागेत स्नान करुन विठुरायाच्या दर्शनाने कृतकृत्य होतील. देशातील गरिबांचा एकमेव देव म्हणून विठ्ठलाकडे पाहिले जाते. या गरिबांच्या देवाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर माउली, संत तुकाराम महाराज आदी संतांच्या पालखी सोहळ्यासमवेत पंढरीत दाखल होतात. सांसारिक जीवनातील अडचणी बाजूला सारून ऊन, वारा, पाऊस अंगावर झेलत वारकरी दरवर्षी न चुकता पंढरीची वारी करतात. दरवेळी पंढरीत येणाऱ्या भाविकांना येथे कोणतेच नावीन्य दिसत नाही. भाविकांची तीच अलोट गर्दी, अलीकडेच ५२ एकरांमध्ये उभारलेल्या राहुट्या, मंदिर परिसरात दाटीवाटीने थाटलेली पूजा साहित्यांची दालने यामध्ये वारकऱ्यांना तोच तोपणा जाणवतो. तरीही पंढरीतील कोणत्याही तक्रारींचा पाढा न वाचता सुमारे दोन हजारांपेक्षा अधिक मठांमध्ये टाळ-मृदंगांचा गजर आणि विठ्ठल नामाचा एकच जयघोष चालू असतो. विठ्ठलाप्रमाणेच त्यांचे भक्तही भोळे-भाबडे असल्यामुळेच अन्य तीर्थक्षेत्रांच्या तुलनेत राज्यकर्त्यांना पंढरीचा विकास करावासा वाटला नसेल. नाशिकमध्ये दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरतो. तेथील सोयी-सुविधा, त्या तीर्थक्षेत्राचा झालेला विकास पाहाता दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरीतील या कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या वारकऱ्यांना सुविधा अत्यंत तोकड्याच आहेत. १९९५ मध्ये राज्यात युतीची सत्ता असताना तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांनी राज्य मंत्रिमंडळाची पंढरपुरात बैठक घेऊन विठुरायाच्या नगरीच्या विकासाची संकल्पना मांडली होती. परंतु, ते कागदावरच राहिले. त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी चंद्रभागेच्या विकासाची संकल्पना देवेंद्र फडणवीस यांनी मांडली होती. परंतु, ती योजनाही मार्गी लागू शकली नाही. तिरुपती बालाजी मंदिर या तीर्थक्षेत्राप्रमाणे पंढरीचा विकास करु, ही कल्पनाही फडणवीस यांनीच मांडली होती. त्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांचे पथकही तिरुपतीला पाठवले होते. त्यानंतर अलीकडेच विठ्ठल मंदिर कॉरीडॉरचा मुद्दा त्यांनी पुढे आणला. परंतु, जनतेला विश्वासात न घेता राबवत असलेली ही योजना आता बासनात गुंडाळून ठेवण्याची वेळ आली आहे. दरवर्षीच्या आषाढी यात्रेवर राज्य सरकारकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो.

# एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम सन २०२४-२५ प्राथमिक प्रक्रीया केंद्र घटकास अनुदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम या योजनेसाठी काढणीपश्चात व्यवस्थापन घटकांतर्गत जिल्हयास प्राथमिक प्रक्रिया केंद्र या घटकास अनुदान मंजुर झालेले असून जिल्हातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

❊घटकाची माहिती खालील प्रमाणे

**प्रकल्पाचे तांत्रिक निकष पुढील प्रमाणे :** प्रकल्पाचा मशिनरी हा महत्त्वाचा भाग असल्याने त्यावर कमीतकमी ६० टक्के खर्च करणे बंधनकारक राहील व प्रकल्पाचे बांधकाम हे गरजेपुरतेच असल्याने त्यावर जास्तीतजास्त ४० टक्के खर्च गृहित धरण्यात यावा. बांधकाम खर्चामध्ये प्रकल्पाच्या इमारत बांधकाम, विद्युत सुविधा उभारणी, वाळवणी आवार, साठवण गृह इ. सर्व घटकांचा समावेश राहील.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :** सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के रक्कम रू. १०.०० लाख आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी रक्कम रू. १३.७५ लाख ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ५५ टक्के अर्थसहाय्य देय आहे. प्राथमिक प्रक्रिया केंद्र हा घटक स्वतंत्रपणे राबविण्यासाठी स्वतंत्ररित्या सदर घटकाच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार लाभार्थी निवडीचे निकष असे असतील, शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी २५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, वैयक्तिक शेतकरी, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (ज्यामध्ये किमान १५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, शेतकरी गट यांचेसाठी अर्थसहाय्य हे बँक कांशी निगडीत असून (उीशवळीं ङळपज्ञशव इरलज़ एपवशव डींळवळू) बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील. तरी जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवर्गातील शेतक- यांना आवाहन करण्यात येते की, वरील प्रमाणे घटकासाठी अधिकाधिक शेतक-यांनी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी.एस. गावसाने यांनी केले आहे.

पान १ वरुन

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ..

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कर्ज योजना, बेरोजगार तरुणांना १२ वी नंतर ६ हजार, डिप्लोमा नंतर ८ हजार व पदवीधर साठी १० हजार प्रशिक्षण भत्ता इत्यादी योजना राबविल्या जात आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांना विमा कंपनीने आतापर्यंत ७ हजार २०० कोटी रुपये अदा केले आहेत. वयोश्री योजनेअंतर्गत वृद्ध व्यक्तींसाठी ३ हजार रुपये देण्यात येत आहेत. एकूणच शासन शेतकरी, कामगार, कष्टकरी, वारकरी अशा सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी उभे असून त्यांच्यासाठी शासन अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवित आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा सांस्कृतिक भवनासाठी शासनाने ५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यासाठी आणखीन १० कोटी रुपये मंजूर करण्यात येतील. निधीची कमतरता भासू देणार नाही. विकास आणि कल्याणकारी योजनांची सांगड घालून शासन सर्व घटकांसाठी काम करत आहे. आषाढी वारी नंतर पंढरपूर शहर स्वच्छ, निर्मळ आणि सुंदर ठेवावे, अशा सूचना देवून वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरक्षित करावा, गडबड करू नये, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व

अकोला तालुका अध्यक्ष अशोक उगले उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार विजेते शिवाजी नायकवडी अगस्ती देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अँड के डी धुमाळ ह भ प राजेंद्र महाराज नवले ह भ प मनोहर महाराज भोर दीपक महाराज देशमुख नितीन महाराज गोडसे विवेक महाराज केदार गणेश महाराज गोडसे विवेक महाराज केदार गणेश महाराज वाघचौरे तुकाराम महाराज आरोटे आधीच पोलीस पत्रकार वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

### एडीस डासांद्वारे होणाऱ्या..

या आजारामध्ये रुग्णालयात भरती होण्याची गरज नाही. मृत्यूचे प्रमाणही अत्यंत नगण्य असल्यामुळे घाबरून जाण्याची अजिबात आवश्यकता नाही. ताप आल्यास जवळच्या शासकीय रुग्णालयामध्ये दाखवावे. कोणताही ताप अंगावर काढू नये. या आजारासाठीचे सर्वोत्तम निदान व उपचार शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध आहे. खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनीसुद्धा त्यांच्याकडे अशाप्रकारचे रुग्ण दिसून आल्यास त्यांनी रुग्णाचा रक्तजल नमुना शासकीय यंत्रणेमार्फत एनआयव्ही, पुणे येथून तपासून घ्यावा.गावातील सर्व पाणीसाठे वाहते करण्यात यावेत. पाण्याची भांडी कापडाने झाकून घ्यावीत, घरातील जे पाणीसाठे रिकामे करता येत नाही, त्यामध्ये गप्पीमासे किंवा टेमिफोस या अळीनाशकांचा वापर करावा. निरूपयोगी टायर नष्ट करावे, रात्री तसेच दुपारी झोपताना मच्छरदाणीचा उपयोग करावा. दिवसा पूर्ण कपड्यांमध्ये रहावे. कोणत्याही परिस्थितीत डासांसाठी पोषक वातावरण निर्माण होऊ देवू नये, असे आवाहन आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

### उद्योगामुळे गडचिरोलीतील सामान्य

घालण्यात आल्या आहेत. त्याचा स्थानिक नागरिकांना फायदा होणार आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये, हे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, गडचिरोली जिल्ह्यातील जल, जमीन, जंगल हे वैभव टिकवूनच येथे उद्योगधंदे सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासोबतच आदिवासींचे दैवत असलेल्या ठाकूर देवाजवळ कोणत्याही प्रकारचे उत्खनन होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. चामोर्शीत सुद्धा ३५,००० कोटींची गुंतवणूक होत असून त्यातून २०,००० इतकी रोजगारनिर्मिती होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

गडचिरोली जिल्ह्यात विमानतळ, रेल्वेचे काम प्रगतीपथावर आहे. यासोबतच येथे शिक्षण हब तयार करण्यात येत आहे. येथील मेडिकल कॉलेजला मंजुरी मिळाली आहे. १७० कोटींचे इनोव्हेशन सेंटर तयार होत आहे, तसेच शासनाने उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या मुलींना शंभर टक्के फी सवलत तर मुलांना ५० टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. गडचिरोली जिल्हा उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने समृद्धी महामार्गाने मुंबईपर्यंत जोडण्यात येणार आहे. यासोबतच चार्मोशी ते काकीनाडा बंदरापर्यंत मालवाहतुकीसाठी जलमार्ग तयार करण्यासाठी अभ्यास समिती नेमण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी राज्यातील जनसामान्यांचा विकास होण्याकरिता आज आषाढी एकादशीनिमित्त पांडुरंगाला साकडे घालत असल्याचे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, गडचिरोली जिल्ह्यातील हजारो कोटींची खनिज संपत्ती येथील आदिवासी समाजाला आर्थिक सुबत्ता देऊन जाईल. त्यानिमित्त जिल्ह्यात येणार्या हजारो कोटी गुंतवणुकीचा येथील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. राज्य शासनातर्फे शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम करण्यात येत आहे. या अनुषंगाने वीजबिलात माफी, धानाला बोनस, दर्जेदार शिक्षण, पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा अशा विविध सवलतीच्या योजनांसोबतच आता महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा दीड हजार रुपये मदत पात्र महिलांना देण्याची योजना शासन राबवत असल्याचे ते म्हणाले. गडचिरोली हे महाराष्ट्राच्या विकासाचे केंद्र बनेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, दावोस कराराच्या अंमलबजावणीचे उदाहरण म्हणजे आजचा भूमिपूजन होणारा हा कार्यक्रम आहे. येथे अजून ३५ हजार कोटींचे प्रकल्प सुरू होणार आहे. तसेच मोठ-मोठ्या कंपन्या येथे उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक असल्याने एकंदरीत उद्योगनगरी असे गडचिरोलीचे नामकरण होणार असल्याचे ते म्हणाले. नुकत्याच झालेल्या जिल्हा गुंतवणूक परिषदेअंतर्गत नागपूर विभागात तब्बल ५ हजार कोटींचे उद्योग येणार असून पुढील एक ते दोन महिन्यात गडचिरोली जिल्ह्यात दीड लाख कोटीचे प्रकल्प येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. धर्मरावबाबा आत्राम यांनी अहेरी विधानसभा क्षेत्रात शिक्षण, सिंचन आणि रोजगार निर्मितीचे लक्ष पूर्ण करून क्रांती घडवून आणायची असल्याचे सांगितले. हा प्रकल्प १० हजार कोटी रुपयांचा असून यातून ७ हजार पेक्षा अधिक स्थानिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. संपूर्ण प्रकल्प २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कंपनीत नियुक्त १६ सुरक्षारक्षकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. याशिवाय स्टील प्लांटतर्फे रुग्णवाहिका व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला उद्योग क्षेत्रातील मान्यवर, संबंधित अधिकारी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### आता खासगी नोकऱ्यांमध्ये..

मंजुरी देण्यात आली आहे त्याचं उल्लंघन जर कारखाने, आस्थापना, कंपन्या यांनी केलं तर त्यांना १० हजार ते २५ हजार रुपये दंड भरावा लागेल. जर दंड भरुनही उल्लंघन करण्यात आलं तर दर दिवशी १०० रुपये दंड भरण्याची तरतूदही या विधेयकात करण्यात आली आहे. बिझनेस स्टँडर्ड ने हे वृत्त दिलं आहे.

**१०० टक्के आरक्षणासाठी कोण पात्र?**

कर्नाटकात राहणारे नागरिक जे १५ वर्षांहून अधिक काळ कर्नाटकात वास्तव्य करतात आणि कन्नड भाषा बोलतात

असे नागरिक ज्यांना कन्नड लिहिता वाचता येते. नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांकडे कन्नड भाषा येत असल्याचं प्रमाणपत्र आवश्यक ❊ नोकरीसाठी इच्छुक कन्नडिगांकडे माध्यमिक शाळेचं प्रमाणपत्र नसल्यास त्यांना नोडल एजन्सीतर्फे होणारी परीक्षा कन्नड भाषेतून पास होणं बंधनकारक❊ खासगी नोकऱ्यांमध्ये १०० टक्के आरक्षण देण्यास मंजुरी असलेल्या या विधेयकात असंही म्हटलं आहे की जर योग्य स्थानिक उमेदवार मिळाले नाहीत तर संस्था, सरकार किंवा विविध एजन्सीज यांनी तीन वर्षांच्या आत प्रशिक्षण देऊन असे उमेदवार तयार करावेत. एखाद्या कंपनी, आस्थापना, उद्योग समूहाला जर स्थानिक लोक मिळालेच नाही तर कायद्यातील तरतुदीतून मुभा मिळण्याचा अर्ज संबंधिक कंपनी, आस्थापना, उद्योग समूह यांनी सरकारला करावा.

खासगी नोकऱ्यांमध्ये कन्नडिगांना आरक्षण देण्यासंबंधीच्या विधेयकाला मंजुरी दिल्याची माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिली होती. मात्र आता ही पोस्ट एक्स या सोशल मीडियावरुन सिद्धरामय्या यांनी हटवली आहे.

### हरियाणा सरकारची ..

हरियाणा सरकार वार्षिक ६० हजार रुपये अनुदान देईल, अशी माहिती मुख्यमंत्री सैनी यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री नायब सिंह सैनी म्हणाले, गट क मधील भरती करताना अग्निवीरांसाठी ५ टक्के जागा राखीव असतील. तसेच जे अग्निवीर चार वर्षांच्या सेवेनंतर परततील, त्यांना जर स्वतःचा व्यवसाय सुरु करायचा असेल तर सरकार त्यांना ५ लाख रुपयांचं बिनव्याजी कर्ज देईल.दरम्यान, सीआरएसएफ, बीएसएफ, सीआरपीएफ व एसएसबीच्या प्रमुखांनी अग्निवीरांसाठी आरक्षणाची घोषणा केली होती. माजी अग्निवीरांना निमलष्करी दलांमध्ये १० टक्के आरक्षणाची घोषणा करण्यात आली आहे. तसेच वयोमर्यादा व शारीरिक चाचणीतही सुट दिली जाणार आहे. सीआयएसएफच्या महासंचालिका नीना सिंह यांनी म्हटलं होतं की पहिल्या तुकडीतील अग्निवीर निवृत्त झाल्यानंतर त्यांना वयोमर्यादेत पाच वर्षांची तर त्यानंतरच्या तुकड्यांमधील अग्निवीरांना निमलष्करी दलांच्या वयोमर्यादेत तीन वर्षांची सूट दिली जाईल.भारतीय सैन्यदलांत १७.५ ते २१ वर्षे या वयोगटातील तरुणांना अग्निवीर म्हणून सेवेची संधी दिली जाते. या तरुणांना चार वर्षांच्या कालावधीसाठी (प्रशिक्षण काळासह) भारतीय सैन्यदलात समाविष्ट करून घेतलं जातं. तसेच त्यांना महिन्याला ३० ते ४० हजार रुपये वेतन (लागू असल्यास स्वतंत्र भत्ता) दिलं जातं. प्रत्येक अग्निवीरास मासिक वेतनातील ३० टक्के रक्कम अग्निवीर समूह निधीत द्यावी लागते. यातून कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांना सेवा निधी अंतर्गत ११.७१ लाख रुपये दिले जातात. अग्निवीराचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांना कामगिरीच्या आधारावर स्थायी सेवेत दाखल करून घेतलं जातं. प्रत्येक तुकडीतील २५ टक्के अग्निवीरांना पद्धतीने स्थायी सेवेत स्थान दिलं जातं.

### लाडक्या भावांसाठीही योजना,

म्हणाले, राज्यात शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्यांचं, वारकऱ्यांचं, कामगारांचं सरकार आहे. हे सरकार सर्वांचं भलं कसं होईल ते पाहतंय. आपल्या सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली. या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना दर महिन्याला १,५०० रुपये, म्हणजेच वर्षाला १८,००० रुपये दिले जातील. तसेच त्यांना दर वर्षी तीन गॅस सिलेंडर दिले जातील. या योजनेचे पैसे लवकरच महिलांच्या खात्यात वळवले जातील.

मुख्यमंत्री म्हणाले, आपण लाडकी बहीण योजना आणली तेव्हा काही लोकांनी आपल्यावर टीका केली. ते म्हणाले, लाडक्या बहिणीसाठी योजना आणलीत, आता लाडक्या भावांचं काय? मला त्यांना सांगायचं आहे की लाडक्या भावांकडेही आमचं लक्ष आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्यासाठीही योजना आणली आहे. जो तरुण १२ वी उत्तीर्ण झाला आहे त्याला दरमहा सहा हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या तरुणाला आठ हजार रुपये आणि पदवीधर तरुणाला १० हजार रुपये महिन्याला दिले जातील. हा तरुण वर्षभर एखाद्या कारखान्यात अप्रेन्टिसशिप करेल, त्यानंतर तिथे त्याला कामाचा अनुभव मिळेल आणि त्या अनुभवाच्या जोरावर त्याला नोकरी देखील मिळेल. एक प्रकारे आपण स्कील्ड मॅनपावर (कुशल कामगार) तयार करत आहोत. राज्यसह देशातील उद्योग जगताला कुशल तरुण पुरवणार आहोत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# स्वच्छ वारी, निर्मल वारी बरोबरच सुरक्षित वारी ही संकल्पना राबवावी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**✻ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये स्वच्छ वारी निर्मल वारी कार्यक्रमाचा समारोप ✻ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'वारी महाराष्ट्र धर्म' कॉपी टेबल बुक च प्रकाशन ✻ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने विषयी सादरीकरण करणाऱ्या कला पथकाला मुख्यमंत्र्याकडून राज्यभरात जनजागृती करण्याचे काम**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर घेण्यात येत असलेले स्वच्छ वारी निर्मल वारी सारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असून यातून लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण होत आहे. पुढील काळात स्वच्छ वारी निर्मल वारी बरोबरच सुरक्षित वारी ही संकल्पना राबविण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पंढरपूर पंचायत समिती परिसरात आयोजित स्वच्छ वारी निर्मल वारी कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मार्गदर्शन करत होते. यावेळी आरोग्य मंत्री तानाजी सावंत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कृषी भूषण गोविंदराव पवार, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की स्वच्छ वारी निर्मल वारी सारख्या उपक्रमामधून स्वच्छतेबरोबर पर्यावरण संवर्धनाचे कामही होणे गरजेचे आहे. पर्यावरणाच्या असमतोलामुळे सन स्ट्रोक हिट स्ट्रोक अशा घटनांचे प्रमाण वाढले आहे. याला पर्याय म्हणून जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याकडे सर्वांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे. बांबू लागवड केल्याने मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजन मिळत आहे, त्यामुळे नागरिकांनी बांबू लागवडीला महत्त्व द्यावे, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

पर्यावरणाचे महत्त्व ओळखून आपल्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही एक झाड आपल्या आईच्या नावाने लावण्याचे आवाहन देशातील नागरिकांना केलेले आहे. त्याप्रमाणे राज्यातील प्रत्येक नागरिकांनी वृक्ष लागवडीस प्राधान्य द्यावे. तसेच राज्यातील प्रत्येक महानगरपालिकेला एक लाख वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट देण्यात येणार असून या माध्यमातून अर्बन फॉरेस्ट ही संकल्पना राज्यभरात राबवली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पंढरपूर शहरात आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर आरोग्य विभागाच्या वतीने चार महाआरोग्य शिबिरे घेण्यात आली यामध्ये आतापर्यंत दहा लाख नागरिकांनी लाभ घेतला आहे. ही आरोग्य शिबिरे वारकरी भाविकांसाठी आरोग्यवर्धिनी ठरत आहेत. ६५ एकर येथे अतिदक्षता विभाग स्थापन करून या माध्यमातून वारकरी भाविकांना उत्कृष्ट आरोग्य सेवा देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. तसेच राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या माझी लाडकी बहीण योजना बरोबरीने अन्य महत्वपूर्ण योजनांची माहिती दिली.

**कॉफी टेबल बुक चे प्रकाशन** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवरांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या ग्रामविकास विभागाने स्वच्छ वरील निर्मल वारीच्या पार्श्र्वभूमीवर 'वारी महाराष्ट्र धर्म' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. तसेच ग्राम स्वच्छता विभागाच्या लोगोचे अनावरण ही झाले.

**जिल्हा परिषदेच्या कला पथकाचा गौरव व राज्यभर कला सादर करण्याची संधी** : स्वच्छ वारी निर्मल वारी कार्यक्रमात कला पथकाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जनजागृतीचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर सादर करण्यात आले. या काल पथकाच्या वेगळ्या सादरीकरणाच्या पद्धतीमुळे मुख्यमंत्र्यांनी या योजनेची राज्यभरात प्रसिद्धी करण्याचे काम जिल्हा परिषदेच्या या कला पथकाला देऊन या कला पथकाच्या कामाचा गौरवही केला व त्यांची आर्थिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केला.

स्वच्छ वारी निर्मल वारी या उपक्रमाची सविस्तर माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी आपल्या प्रस्ताविकात दिली. यावर्षी ग्रामविकास विभागाने आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर जिल्हा परिषदेला दहा कोटीचा भरीव निधी दिल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे वारकऱ्यांना आवश्यक सुविधा देणे जिल्हा परिषदेला शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. या समारोप कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी विरोधात नागद ग्रा.पं. समोर माजी सरपचांचे उपोषण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कन्नड : जिल्हाधिकाऱ्यांविरोधात कन्नड तालुक्यातील नागद येथील ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर माजी सरपंच राजधर आहिरे यांनी १०जुलै २०२४ बुधवारी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

सरकारी जमिनीवर अतिक्रमण केल्याप्रकरणी नागद येथील ग्रामपंचायतीचे सरपंच राजधर आहिरे यांचे पद रद्द करण्यात यावे, अशी तक्रार गावातील विष्णू ससाने यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानंतर या प्रकरणी सुनावणी होऊन जिल्हाधिकाऱ्यांनी सरपंच आहिरे यांनी अपात्र ठरविले होते. दरम्यान, या प्रकरणी आहिरे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाद मागितली असता खंडपीठाने जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय रद्द करून आहिरे यांची सरपंचपदी निवड करण्याचे आदेश दिले होते. दरम्यान, नागदच्या सरपंचपदासाठी निवडणूक घेऊन आहिरे यांच्याऐवजी अन्य सदस्याची प्रशासनाने निवड केली. ही निवडणूक रद्द करून औरंगाबाद खंडपीठाच्या निकालानुसार



माझी सरपंचपदी निवड करावी, अशी लेखी मागणी गेल्या दोन वर्षांपासून आहिरे जिल्हाधिकाऱ्यांकडे करत आहेत. परंतु त्यांना अद्यापपर्यंतही न्याय मिळाला नाही. अखेर आहिरे यांनी ग्रामपंचायत सदस्य शोभाबाई आहिरे शुभम अहिरे व समर्थकांसह नागद ग्रामपंचायतीसमोर १० जुलै २०२४ बुधवारपासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. संबंधित अधिकारी कधी व काय कार्यवाही करणार या कडे नागद ग्रामस्थांचं लक्ष लागलं आहे

# परशुराम सहकारी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था तडवळ येथे पहिली सभा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः परशुराम सहकारी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था तडवळ येथे पहिली सभा चेअरमन मा.खाजप्पा गायकवाड यांच्या अध्यक्षेतेखाली संपन्न झाला त्यावेळी उपस्थित संचालक मंडळ तसेच सभासदांनी आपली भावना व्यक्त करताना म्हणाले की प्रा. बसवंत गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नाने आणि संघर्षाने २ कोटीचा संस्था पुनर्जीवन करून सर्वांचे संजीवनी ठरला यांचा सार्थ अभिमान आहे तसेच निम्याहून अधिक सभासद मयत झाले आहे. उरलेले आम्ही मयतीच्या मार्गावर आहे. संस्थेची जागा आपल्याला मिळतील अशी स्वप्नात सुद्धा विचार किलो नाही ते प्रत्यक्षात करून दाखवले. अशा शब्दात सभासदांनी भावना व्यक्त केले.प्रा. बसवंत गायकवाड यांनी आपले मत मांडताना म्हणाले की संस्थेच्या पुनर्जीवन करण्याचं काम हाती घेऊन काटेच्या वाटेनी चालत असताना अनेक संकटे आले. त्यातून सावरण्यासाठी गौतम बुद्धाचे शांतीचे विचार आणि डॉ बाबासाहेब यानी केलेली क्रांती हेच उत्क्रांती म्हणून मनाशी जिद्द बाळगून संघर्षाचे



विजय डोळ्यासमोर ठेऊन कायद्याची लढाई लढत राहिलो. आणि सहकारी कोर्टाची पायरी चढत राहिलो . सहकारी कोर्टाने दोनदा फेटाल्यानंतर मुंबई येथे सहकारी कोर्टात अपील दाखल करून शेवटी सत्याचा विजय करून दाखवलो. त्यात एकट्याचा विजय नसून सर्व सभासदांनी ठेवलेल्या विश्र्वासाचं विजय आहे असे त्याचबरोबर पुढे म्हणाले की . मी हाती घेतलेल्या संस्थेच्या पुनर्जीवन यशस्वी कार्याला हत्तीचा वाटा असणारे मा.सुशीलकुमारजी शिंदे (माजी केंद्रीय गृहमंत्री), मा.एकनाथरावजी शिंदे (मुख्यमंत्री), मा.विश्र्वजित पतंगराव कदम (सहकार राज्यमंत्री), मा.सिद्धारामजी म्हेत्रे माजी (गृहराज्य मंत्री),

मा.सचिन दादा कल्याणशेट्टी (आमदार)शहर नगरध्यक्ष चेतनजी नरोटे, माझे मार्गदर्शक मा. दत्तात्रय मोरे (माजी सहायक निबंधक अक्कलकोट ), मा.एस.जे.दडस (सहायक निबंधक अक्कलकोट ) मा.के.बी.जमादार (सहायक अधिकारी) कुंभार सर (लिपिक)संस्थेची वकील. उमेश मराठे, ॲड.वाबळे, ॲड. वाघचौरे तसेच माझे सोबती बंधू.मा.राजशेखर गायकवाड यांच्या सहकार्याने हा विजय मिळवला आहे. हा विजय माझा नसून . आपल्या सर्वांचा आहे अशा शब्दात आपली भावना व्यक्त केली. सभासद शिवानंद शिवशरण, प्रशांत गायकवाड आणि यांनीही आपली भावना व्यक्त करताना म्हणाले की शासनाने आपल्या संस्थेतील सभासदाच्या हितासाठी खास बाब म्हणून निधी मंजूर करतील अशी आशा व्यक्त केले त्यावेळी मा.चंद्रशा गायकवाड(व्हा. चेअरमन), मा.हणमंत गायकवाड (सेक्रेटरी), मा.परसप्पा गायकवाड (संचालक) मा.मलकण्णा मडीखांबे (संचालक) सौ.कस्तुरबाई शिवशरण (संचालिका)आदी समवेत सभासद मा.पंडित गायकवाड,नागेश शिवशरण, बाबुराव गायकवाड, मलू गायकवाड, विठ्ठल गायकवाड, अमोल शिवशरण, सिद्धाराम गायकवाड, श्रीमती चंदावा गायकवाड , आदित्य शिवशरण प्रशांत गायकवाड, रमेश गायकवाड आदी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात गुरुपौर्णिमा यात्रा महोत्सवनिमित्त देशभक्ती कार्यक्रमासह विविध धार्मिक कर्यक्रम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील भिगवण आणि स्वामी चिंचोली सरहद्दीवर वसलेले श्रीक्षेत्र भक्तीलिंग मल्लिनाथ महाराज देवस्थान येथे जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सद्गुरू श्री हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात गुरुपौर्णिमा यात्रा महोत्सवनिमित्त देशभक्ती कार्यक्रमासह विविध धार्मिक कर्यक्रम आयोजित केले आहेत.

संसाराच्या व्यापातून थोडाकाळ विश्रांती मिळावा आणि भक्ताने आपले जिवन सार्थक करून शिव भक्तीतून देश भक्ती मार्गाकडे वळावे, या प्रमुख उद्देशाने सदगुरु श्री हवा मल्लिनाथ महाराजांनी आंध्रप्रदेश, तेलगण, कर्नाटका, महाराष्ट्रा, गुजरात, राज्यस्थान अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात सुमारे सहा हजारोहून अधिक शिवलिंग मंदिर आणि जय भारत माता सेवा समितीचे शाखा स्थापना केले आहेत. त्या पैकी भिगवण (स्वामी चिंचोली) येथील भक्तीलींग देवस्थान हे सर्वोच्च असून नवसाला पावणारा स्वयं जागृत सर्व धर्मीय श्रद्धास्थान देवस्थान आहे. या गुरुपौर्णिमा यात्रेस प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही देश भरातील लाखो भाविक भक्त मोठ्या प्रमाणात येणार असल्याने यात्रा कमिटीचे वतीने यात्रेची जयत्त तयारी करण्यात येत आहे. शनिवार दि.२०जुलै रोजी रात्रौ देशभक्ती गीत, भजन, भारुड इत्यादी कार्यक्रम होणार असून रविवार दि.२१ रोजी पहाटे श्री चे महापूजा, महारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार आहे. सकाळी आठ वाजता श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत काढण्यात येणार आहे. शनिवार आणि रविवार दिवसभर भक्ताचा राजा सदगुरु श्री हवा मल्लिनाथ महाराजाचा दर्शन सोहळा कार्यक्रम आहे.तरी भाविक भक्त आणि देश भक्तांनी उपस्थित राहून सदगुरूचा दर्शन, महाप्रसादाचा आणि देशसेवेचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमिटी वतीने करण्यात आला आहे

**गुरू सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ आहे.सर्व भक्तांनी अंतकरणातून देश सेवा केला पाहिजे. इतर पूजा आणि सेवा पेक्षा देश सेवा सर्व श्रेष्ठ आहे. देश वाचला तरच आम्ही सर्व जण वाचणार आहोत. देशाचे एकता परंपरा अखंडपणे राखण्यासाठी सर्वांनी देशच माझे घर देशच माझे परिवार असे समजून एकजुटीने राहिले पाहिजे.**

**– सदगुरु श्री हवा मल्लिनाथ महाराज,अध्यक्ष राष्ट्रीय संस्थापक जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली.**

# आषाढी एकादशीनिमित्त गणेश चिवटे यांच्या हस्ते देवळाली येथे भाविकांना फराळ वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशी निमित्त गणेश चिवटे यांच्या हस्ते करमाळा तालुक्यातील देवळाली येथे भाविकांना फराळ वाटप करण्यात आला देवळाली येथील छत्रपती प्रतिष्ठान व गणेश भाऊ चिवटे युवा मंच यांच्याकडून आषाढी एकादशीनिमित्त भाविकांना फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले होते गणेश चिवटे करमाळा तालुक्यातील गरीब व गरजू निराधार वृद्ध व नागरिकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना दररोज मोफत जेवण देऊन अन्नदान केले होते याचाच एक भाग म्हणून आज आषाढी एकादशी निमित्त



पंढरपूर येथून विठ्ठल रुक्माई चे दर्शन घेऊन येणाऱ्या भाविकांना आषाढी एकादशीनिमित्त गणेश भाऊ चिवटे युवा मंच व छत्रपती प्रतिष्ठान यांच्याकडून भाविकांना फराळ वाटप करण्यात आले.यावेळी पंढरपूर होऊन आलेल्या भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली यावेळी सहकार्य मित्र भाजप तालुका अध्यक्ष रामभाऊ ढाणे शहाजी पाटील संदिपान कानगुडे सतीश बापू कानगुडे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष म्हणून अमोल पवार छत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष भैया राज गोसावी रमेश गायकवाड नितीन कानगुडे सचिन कानगुडे जयंत काळे पाटील भारत चोपडे चेतन राखुंडे लखन शिंदे किरण गोसावी राजू जगताप तात्या जाधव गुरुजी बापू जगताप देवळाली येथील छत्रपती प्रतिष्ठानचे भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महापूजेपूर्वी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील स्वच्छतेची पाहणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशी वारी निमित्त पंढरपूर शहरात लाखो भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेले आहेत. जिल्हा प्रशासनाने वारकरी व भाविकांसाठी अनेक सोयी सूविधा उपलब्ध करून दिलेले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय महापूजेपूर्वी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी महाद्वार, कुंभार घाट व विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात स्वच्छतेची पाहणी केली व संबंधित अधिकारी व साफसफाई कर्मचारी यांना दक्ष राहण्याबाबत निर्देशित केले.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी या परिसरातील रस्ते व शौचालयाची स्वच्छता पाहणी करून पंढरपूर नगर परिषदेचे स्वच्छतेचे अधिकारी व साफसफाई कर्मचारी यांना स्वच्छता मोहीम व्यवस्थितपणे राबवण्याबाबत सूचित केले. रस्त्याच्या कडेची घाण, शौचालय स्वच्छ करणे, रस्त्याची साफसफाई करणे व शौचालय मधील विस्टा तात्काळ सक्शन मशीनच्या माध्यमातून काढून परिसरा बाहेर घेऊन जाणे याबाबतची माहिती घेऊन संबंधितांनी महाद्वार, कुंभार घाट परिसर व विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात कोणत्याही प्रकारची अस्वच्छता राहणार नाही या अनुषंगाने तत्परता बाळगावी असे सांगितले. यावेळी नगर परिषदेचे



स्वच्छता निरीक्षक श्री. वाघमारे व साफसफाई कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्राचे हास्य जत्रा या मनोरंजनात्मक कार्यक्रमात सामाजिक, राजकीय चालू घडामोडीवर विनोदातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः ख्यातनाम हास्य कलाकार समीर चौगुले, ओंकार राऊत, ईशा डे, प्रसाद खांडेकर, चेतन भट, अरुण कदम, प्रभाकर मोरे, वनित खरात, नम्रता संभेराव, शाम राजपूत, पृथ्वीक प्रताप व सहकारी यांचा महाराष्ट्राचे हास्य जत्रा या मनोरंजनात्मक कार्यक्रमात सामाजिक, राजकीय चालू घडामोडीवर विनोदातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. याबरोबरच विविध गाण्याने रसिकातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, दि. १७ जुलै रोजी बुधवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत महाराष्ट्राचे हास्य जत्रा सादरकर्ते समीर चौगुले, ओंकार राऊत, ईशा डे, प्रसाद खांडेकर, चेतन भट, अरुण कदम, प्रभाकर मोरे, वनित खरात, नम्रता संभेराव, शाम राजपूत, पृथ्वीक प्रताप आणि सहकारी यांचा धमाल उडवणारा ह्या कार्यक्रमाने ७ वे पुष्प संपन्न झाले. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन : महेश गावसकर पुणे, मिलन कल्याणशेट्टी, मल्लिकार्जुन पाटील, दत्ताअण्णा सुरवसे सोलापूर, प्रथमेश म्हेत्रे, गिरीश कणेकर(उद्योजक,शुभम बिल्डर्स, सोलापूर ) अशपाक बळोरगी, संपतराव शिंदे करमाळा, नारायणराव जोशी सोलापूर, डॉ. यशवंतराव डावखर, संजीवकुमार, दिलीप भाऊ सिद्धे, सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल सनगले, सागर पाटील वळसंग, संजय देशमुख, बसलिंगप्पा खेडगी, रईस टीनवाला, यशवंततात्या धोंगडे, महेश हिंडोळे, मोतीराम राठोड, आनंद तानवडे, शिवशरण जोजन, लाला राठोड, उत्तम गायकवाड, अविनाश मडीखांबे, सुनिल बंडगर, शिवराज स्वामी, डॉ.प्रदिप घिवारे, मुजावर हैद्रा, अनिल राठोड पुणे, विलास राठोड, मल्लिनाथ स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा व कलाकारांचा सत्कार न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले व मंडळाच्या पदाधिकारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. यावेळी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, अनुयाताई फुगे, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले, आरती पोतदार, कोमल क्षीरसागर व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, विश्र्वस्त राजेंद्र लिंबीतोटे, संदिप फुगे, सौरभ मोरे, शितल फुटाणे, संतोष भोसले, डॉ. आर.व्ही. पाटील, अमर पाटील, प्रा.प्रकाश सुरवसे, प्रा.भीमराव साठे, आत्माराम घाडगे, महेश गोगी, अरविंद शिंदे, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्र्वर उटगे, अरविंद शिंदे, राजाभाऊ निकम, मनोज निकम, सनी सोनटक्के, अप्पू कलबुर्गी, स्वामीराव सुरवसे, बाळासाहेब मोरे, सायबण्णा जाधव, वैभव नवले, ज्ञानेश्र्वर भोसले, प्रा.शरणप्पा अचलेर, अप्पा हंचाटे, पिटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, सौरभ मोरे, महादेव अनगले व राजेंद्र पवार, माने, श्रीनिवास गवंडी, प्रसाद हुल्ले, महादेव होळ्ळा, मामा जकापुरे, शैलेंद्र शिंगणे, शाहीद वळसंगकर, राजू एकबोटे, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, गणेश पाटील, प्रीतीश किलजे, सिध्दाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिकार्जुन कोगाणुरे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले.

**विशेषगौरव पुरस्कार : निवेदिका श्रीमती श्र्वेताताई हुल्ले यांच्या सह गुणीजन गौरव : विठ्ठल रामराव मोरे, महमद इस्माईल बेसकर, डॉ.राहूल लिंबीतोटे, आतिश पवार, वैजिनाथ तालीकोटी यामध्ये यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**दि. १८ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'स्वर संध्या' सादरकर्ते – महेश काळे आणि सहकारी, पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे.**

# ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते चंद्रभागा बसस्थानक व यात्री निवास इमारतीचे लोकार्पण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्यावतीने पंढरपूर येथे उभारण्यात आलेले चंद्रभागा बसस्थानक व यात्री निवास इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी गिरीश देशमुख, महाव्यवस्थापक शिवाजी जगताप, दिनेश महाजन, पुणे विभागाच्या उप महाव्यवस्थापक यामिनी जोशी, पंढरपूर विभाग नियंत्रक विनोद



भालेराव आदी उपस्थित होते. महाजन यांनी चंद्रभागा बसस्थानक व यात्री निवास इमारतील सुविधांची पाहणी केली.

**चंद्रभागा बसस्थानक व यात्री निवास इमारत**


आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या यात्रेसाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी एसटी महामंडळाकडून आपल्या ११ हेक्टर जागेवर ३४ फलाटाचे अति भव्य चंद्रभागा यात्रा बस स्थानक निर्माण करण्यात आले आहे. तसेच पंढरपूरला दररोज येणाऱ्या भाविक- यात्रेकरूंच्या निवासाची अल्प दरात सोय व्हावी या दृष्टीने बस स्थानकाला लागूनच यात्री निवास बांधण्यात आले आहे. या यात्री निवासामध्ये ५०० एसटी कर्मचारी तसेच एकाच वेळी सुमारे १ हजार यात्रेकरुंची निवासाची सोय होणार आहे. एसटी कर्मचारी व यात्रेकरूंसाठी २ सुसज्ज उपहारगृहे देखील बांधण्यात आली आहेत.राज्यात एसटी महामंडळाचा हा पहिलाच प्रकल्प असून त्यासाठी एकूण ३३ कोटी रुपये खर्च आले आहेत.

या बसस्थानकात वाहतूक नियंत्रण कक्ष, आरक्षण कक्ष, पुरुष व महिला व दिव्यांगाकरीता स्वतंत्र विश्रांतीगृह आणि प्रसाधनगृह, हिरकणी कक्ष, आपला दवाखाना, जेनेरिक औषधालय, पार्सल कक्ष, पोलीस मदत केंद्र, वातानुकूलित प्रतीक्षालय, प्रशस्त वाहनतळ, दोन उद्वावाहक आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या बस स्थानकावरून राज्यात सर्व ठिकाणी एसटी बसेस सोडण्यात येणार असल्याने प्रवाशांना याचा लाभ होणार आहे.

# दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हांचे अनावरण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

धाराशिव/प्रतिनिधीः संत चोखामेळा अध्यासन केंद्र व वृंदावन फाऊंडेशन , पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार २८ व रविवार २९ सप्टेंबर रोजी तीर्थक्षेत्र पैठण येथे होणाऱ्या दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलन २०२४ च्या बोधचिन्हांचे अनावरण देवशयनी आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी धाराशिव शहरातील संत मुक्ताबाई मंदिरात संत मुक्ताबाई यांच्या परम भक्त , अभ्यासक व त्यांच्या विचार कार्याच्या प्रसारक मंगलताई वाघ यांच्या शुभहस्ते करण्यात आले . याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत शेषाद्रीआण्णा डांगे , अजयराव जानराव , साहित्यिक



डॉ.रूपेशकुमार जावळे , सतिशराव कोळगे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव येथील प्रो. डॉ.महेश्र्वर कळलावे उपस्थित होते. संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे संस्थापक सचिन पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करत दुसरे संत चोखामेळा साहित्य संमेलन , पैठण व बोधचिन्ह संबंधित आपली भूमिका मांडली. सोयराबाई : संत , कवी आणि माणूस असा मध्यवर्ती आशय घेऊन संपन्न होत असलेले दोन दिवसीय साहित्य संमेलन एकूण सहा सत्रात विभागून होणार असून महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील नामवंतांच्या उपस्थितीत तीर्थक्षेत्र पैठण येथे शनिवार २८ व रविवार २९ सप्टेंबरला संपन्न होणार आहे. या साहित्य संमेलनात परिसंवाद, चर्चासत्र,कविसंमेलन , संत साहित्य प्रदर्शन, उद्बोधन व संत साहित्याचे देखावे असणार आहेत. सदरील संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून संत सोयराबाई यांच्या साहित्याचे अभ्यासक , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे च्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे असणार आहेत. सदरील बोधचिन्ह अनावरण सोहळ्यास साहित्यिक बाळ पाटील , ऍड. महारुद्र जाधव , राजेंद्र मोरे , पांडुरंग मते आदींची प्रमुख उपस्थिती होती . कार्यक्रमाचे निवेदन डॉ. कृष्णा तेरकर तर आभार विजय गायकवाड यांनी मानले . याप्रसंगी धाराशिव शहरातील साहित्यिक , सांस्कृतिक, आध्यात्मिक , सामाजिक परिघातील विविध मान्यवर उपस्थित होते .

# डॉ भीमराव आंबेडकर वेबसिरिज चे बार्टीने सादरीकरण करावे : ना.रामदास आठवले



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधीः नुकतेच केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले यांनी शासकीय अतिथी विश्राम गृह येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या विविध योजनाचा आढावा घेतला. यावेळी समाज कल्याण आयुक्त श्री प्रवीण पुरी, बार्टीचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी ना. रामदास आठवले यांना डॉ. आंबेडकर यांची प्रतिमा आणि द प्रॉब्लेम ऑफ रुपी ग्रंथ व पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. या आढावा बैठकीत मा महासंचालक श्री सुनील वारे यांनी बार्टी संस्थेच्या विविध योजनाची माहिती दिली. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित भीमराव ते बाबासाहेब या वेब सिरीजची निर्मिती करण्यास नियामक मंडळाने मान्यता दिली असल्याचे सांगितले.यावेळी विभागप्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी या वेबसिरीजची संकल्पना,आशय, निर्मितीआणि इतर अनुषंगिक बाबीची सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी सांगितले की भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाचे संविधान लिहून या देशातील जनतेला न्याय दिला असुन त्यांनी सामाजिक समतेसाठी काम केले त्यांच्या कार्याला राजर्षी शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड व समाजातील अनेक लोकधुरीनांचा सहवास लाभला महाडच्या सत्याग्रहात शस्त्रबुद्धे, चित्रे, सुरबानाना टिपनिस यांचे सहकार्य लाभले.

बुद्धाच्या मार्गावर जातांना कृष्णाजी केळुस्कर गुरुजी यांनी भीमरावाना शालांत परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना बुद्ध चरित्र भेट देण्यात आले होते.यामधुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सोशल इंजिनिअरिंग दिसून येते. भीमराव ते बाबासाहेब हा जडणघडणीचा प्रवास वेबसिरिज द्वारे बार्टी उलगडणार असुन या वेबसिरिजचे सादरीकरण बार्टीने करावे असे निर्देश केन्द्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदासजी आठवले यांनी दिले. यावेळी विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, यांच्यासह समाजकल्याण व बार्टीतील अधिकारी तसेच माजी उपमहापौर डॉ सिद्धार्थ धेंन्डे, बाळासाहेब जानराव, परशुराम वाडेकर, अशोक कांबळे, संजय सोनवणे , आयुब शेख,यशवंत नडघम आदी उपस्थित होते.

# अनंत चैतन्य प्रशालेचा विठ्ठल दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक व धार्मिक वैशिष्ट्य मानले जाणारे विष्णुमय जग,वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ किंवा हरिहरा भेद नाही अशा स्वरूपाचे सर्वधर्मसमभावाचे शिकवण देणारे वारकरी संप्रदाय विठुमाऊलीच्या दर्शनाच्या ओढीने आसुसलेला,ऊन,वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता,घरदार सोडून,वय विसरून बेभान होऊन पंढरपुर च्या दिशेने निघालेला, नित्यनेमाने वारी करणारा वारकरी व त्याची भक्ती याची अनुभूती व्हावी याकरिता - महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे आज वारी पर्यावरण रक्षणाची व विठुमाऊलीचा दिंडी सोहळा कार्यक्रम अतिशय उस्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. प्रारंभी प्राचार्य श्री. अशोक साखरे सर यांच्या हस्ते विठ्ठल- रुक्मिणी माता, ज्ञानेश्र्वरी व तुकारामगाथेची पुजा करून आरती करण्यात आली. यानंतर शाळेपासून ते हन्नूर गावातून दिंडी निघाली तेंव्हा गावातील अनेक माताभगिनीनी विठ्ठल- रुक्मिणी पालखीचे पाणी घालून, नारळ फोडून जंगी स्वागत केले .टाळ, मृदुंग, वीणा , कपाळास टीळा,गळयात तुळशीमाळ घालून,वैष्णव पताका खांद्यावर घेऊन ,मुखाने हरिनामाचा जयघोष करत,झिम्मा ,फुगडी, कोलांट उडी,रिंगण ,भजन करत निघालेली पांढऱ्या वेशभूषेतील मुले व साडी नेसलेल्या मुलींमुळे जणू वारीचेच स्वरूप आले होते.व मुलां- मुलींनी या दिंडी सोबतच गावकऱ्यांना वारीच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा ही संदेश दिला. अप्रतिम अशा या दिंडी सोहळा व पर्यावरण रक्षणाच्या वारीचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार मा.



सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य तथा आधारवड मा. सिध्देश्र्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी,हन्नूर गावचे उपसरपंच व युवा नेते मा. सागरदादा कल्याणशेट्टी,संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, संस्थेच्या सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुकासह अभिनंदन केले. ही वारी यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे समस्त शिक्षक बंधू- भगिनी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्रातील अधिकृत दैनिक व साप्ताहिक चे संपादक ,पत्रकार यांना मानधन मिळण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कल्याणी वाघमोडे यांचे निवेदन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा मंत्री, माहिती व जनसंपर्क यांना क्रांती शौर्य सेनेच्या अध्यक्ष कल्याणी वाघमोडे यांनी अधिकृत दैनिक व साप्ताहिक संपादक व पत्रकार यांना मानधन मिळणेबाबत निवेदन दिले. विषयास अनुसरून, लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या प्रिंट व डिजिटल मीडिया मधील दैनिक, साप्ताहिक, मासिक चालवणाऱ्या संपादक व पत्रकारांना अनेक गोष्टींना सामोरे जात शासनाच्या व इतर कार्यक्रमांच्या बातम्या सादर करण्यासाठी कसरत करावी लागते. लोकशाही जिवंत ठेवणाऱ्या व आवाज



उठवणाऱ्या अशा संपादक व पत्रकारांना दर महिन्याला १०००० रुपये मानधन मिळावे, हि अपेक्षा निवेदन देत कल्याणी वाघमोडे यांनी केली. तसेच शासनमान्य यादीसाठी स्थायी समितीच्या बैठका दरवर्षी वेळेत पूर्ण होऊन तत्काळ निर्णय घेण्यात यावेत. बिगर शासनमान्य यादीवरील दैनिक व साप्ताहिकांना २०१८ पर्यंत दर्शनी ५ जाहिरात मिळत होत्या. परंतु २०१९ पासून हे जाहिरात देणे बंद झाले. त्यामुळे साप्ताहिक व दैनिक चालवणे हे फार आव्हानात्मक झाले आहे. अशा दैनिक साप्ताहिकांना जिवंत ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या मागण्या मान्य कराव्यात, अशी विनंती पत्राद्वारे केली.यावर निवेदन स्वीकारत बैठकीत विषय घेऊन निर्णय घेऊ असे मत मुख्यमंत्री यांनी व्यक्त केले. आषाढी एकादशीच्या पूजेसाठी मुख्यमंत्री व कुटुंब पंढरपूर कडे बारामती विमानतळ येथून रवाना झाले.